# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान पाचवा रविवार - १५ मे २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू ः** माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपल्या कळपासह देव पिता व पुत्र ह्यांचा गौरव करण्यासाठी सामर्थ्य व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. देशाच्या संपत्तीचा सद्पयोग देशहितासाठी व जनकल्याणासाठी करण्यास राजकीय व शासकीय नेत्यांना सतत प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. प्रभू ख्रिस्ताने आपल्याला प्रीतीची नवीन आज्ञा दिली आहे. आपल्या शत्रूंवर, शेजा-यांवर व एकमेकांवर निस्वार्थीपणे प्रेम करून प्रभूच्या ह्या आज्ञेचे आपल्याला पालन करता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. पुनरूत्थित ख्रिस्ताची शांती आपल्या जीवनाद्वारे व कृतीद्वारे प्रकट होऊन ती समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित घटकापर्यंत आपल्याला पसरता यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोना विषाणूपासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे तसेच आज/उदया विबाहबद्ध होत असलेल्या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू ः** हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.